Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थ्यांना आवाहन

## (अंतिम वर्ष / अंतिम सत्रासाठी परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांच्यासाठी)

**संदर्भ:—** 1) शिवाजी वि / परीक्षक नियुक्ती / आरव्हीसी / 304, दिनांक:—14 सप्टेंबर, 2020
2) शिवाजी वि / परीक्षक नियुक्ती / आरव्हीसी / 311, दिनांक:—17 सप्टेंबर, 2020

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत असणा-या महाविद्यालय / अधिविभागात / दूरशिक्षण अभ्यास केंद्रामार्फत शिक्षण घेणा-या अंतिम वर्ष / अंतिम सत्रासाठी परीक्षा देणा-या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेच्या आयोजनाबाबत विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालये आणि अधिविभागांना परिपत्रकाद्वारे यापूर्वीच, कळविण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार परीक्षेस प्रविष्ठ होणा-या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालयामार्फत / अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अद्यावत करण्याबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत पुन्हा विद्यार्थ्यांना आवाहन करणेत येते की, **विद्यार्थ्यांनी त्यांचा स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालयामार्फत / अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये अपडेट करण्यासाठी दि. 08 ऑक्टोंबर, 2020 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

वरील माहिती फक्त उन्हाळी 2020 साठी अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अद्यावत करण्यात यावी. तसेच वरीलपैकी (अंतिम वर्ष / अंतिम सत्र) ज्या विद्यार्थ्यांचे PRN क्रमांक संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्यांचे मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी Excel Sheet मध्ये भरून exam.itcell@unishivaji.ac.in वर महाविद्यालयांनी / अधिविभागांनी सत्वर पाठवावेत.

**ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही ईमेल आणि मोबाईल क्रमांक अद्यावत केलेले नाहीत त्यांनी तात्काळ संबंधित महाविद्यालय / अधिविभाग / दूरशिक्षण अभ्यास केंद्राशी संपर्क साधून माहिती अद्ययावत करून घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन देणार असलेबाबत पर्याय निवडलेला नाही त्यांनी तात्काळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Online Portal सदरामध्ये Option form for students to appear Examination Mar./Apr. 2020 या लिंकमध्ये पर्याय निवडावा, असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात येत आहे.**

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ